

# दीनदयाळ समाज सेवा केन्द्र

(नोंदणी क्र. ई - 11260 मुंबई, दि. 29-6-1987)
क 57, गणेश नगर सोसायटी, गोगटे वाडी, गणपती मंदिर, गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063. दूरध्वनी : 29275408

**कृपया प्रसिध्दीसाठी** **26 सप्टेंबर 2011**

## अर्थाचा प्रभाव आणि अर्थाचा अभाव दोन्हीही चुकीचेच मानणा-या पं. दीनदयाळ यांचे विचार आजही अनुकरणीय : प्रकाश जावडेकर

**मुंबई,सोमवार:**"समाजजीवनात अर्थाचा प्रभाव अर्थात पैसेवाल्यांची मक्तेदारी जाणवत असेल किंवा अर्थाचा अभाव म्हणजेच सामान्यांकडे पुरेसा पैसा नसेल तर देशाची प्रगती होऊ शकत नाही या दोन्ही गोष्टींचे अस्तित्व देशात नको हे पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांचे अर्ध शतकापूर्वीचे विचार आजही अनुकरणीय वाटतात यातच त्यांच्या विचारांचे यश आहे'', असे मत भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ता व खासदार श्री. प्रकाश जावडेकर यांनी व्यक्त केले. पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त मुंबईतील गोरेगाव येथे दीनदयाळ समाज सेवा केंद्राने आयोजित केलेल्या व्याख्यानात श्री. जावडेकर बोलत होते. माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

'पं. दीनदयाळ उपाध्याय - आजच्या संदर्भात' या विषयावर व्याख्यान देत असताना खासदार श्री. जावडेकर म्हणाले, ''पं. दीनदयाळ हे द्रष्टा नेते होते. त्यामुळेच आज त्यांच्या मृत्यूला 43 वर्षे झाल्यानंतरही त्यांचे विचार तसेच ताजे आणि अनुकरणीय वाटतात. एखादा राजकीय पक्ष म्हणजे धगधगते आंदोलन असले पाहिजे असे त्यांचे मत होते. सरकारविरुद्ध आंदोलने करणे एवढेच राजकीय पक्षाचे काम नसते, तर ज्या बाबींविरुद्ध आंदोलन केले जाते त्यांना सशक्त पर्याय देण्याचे कामही राजकीय पक्षाचे असते, असे एकीकडे सांगणा-या दीनदयाळ यांनी अर्धशतकापूर्वी मुक्त अर्थकारणाचे स्वप्न पाहिले होते. आज सर्वत्र जागतिकीकरणाचे लोण असताना म्हणूनच त्यांच्या द्रष्टेपणापुढे नतमस्तक व्हावेसे वाटते. एका बाजूला उद्योजकांना बंधनरहित व्यवसाय करता आला पाहिजे मात्र त्याचवेळेला अर्थ-प्रभाव किंवा अर्थ-अभाव असता कामा नये अशी पं. दीनदयाळ यांची सामान्य जनतेच्या हिताची भूमिका होती.'' देशात प्रत्येक हाताला काम आणि शेताला पाणी देण्याचे त्यांचे स्वप्न आजही अपूर्ण असल्याची खंत मात्र यावेळी श्री. जावडेकर यांनी व्यक्त केली.

..2..

दीनदयाळ समाज सेवा केंद्राने सामाजिक प्रबोधनासाठी व्याख्यान आयोजित करीत असतानाच दुसरीकडे आपली सामाजिक बांधिलकी व्यक्त करताना गोरेगावातील ज्येष्ठ समाजसेवक व पुनर्वास मतिमंद संस्थेचे संस्थापक श्री. प्रभाकर मोडक (83 वर्षे) यांचा यावेळी सत्कार केला. माजी आमदार व भाजपा उत्तर मुंबईचे माजी अध्यक्ष श्री. माधव मराठे यांचाही 80 वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने यावेळी सत्कार करण्यात आला. 3200हून अधिक पत्रे मराठी वृत्तपत्रांतून लिहीणारे ज्येष्ठ पत्रलेखक व विद्यावर्धिनी शिक्षण संस्थेचे विश्वस्त श्री. मधुकर ताटके (81 वर्षे) यांनाही यावेळी सन्मानित करण्यात आले.

समाजापुढे आदर्शांची नितांत आवश्यकता असते, या भूमिकेतून हे सत्कार करण्यात आल्याचे सांगत असताना माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक म्हणाले,''आदर्श व तत्वांबाबत कधीही तडजोड न करण्याची शिकवण पं. दीनदयाळ यांनी दिली. ज्यावेळी भारतीय जनसंघ मूळ धरत होता अशा सुरुवातीच्या काळात राजस्थानात आमचे फक्त 7 आमदार होते. 'कसेल त्याची जमीन' या विधेयकासंबंधी पक्षाचा आदेश मानण्यास त्या वेळच्या जहागिरदार-जमीनदार असलेल्या सहा आमदारांनी नकार देत बंडाचे निशाण फडकावले. अशा परिस्थितीत तत्वांशी तडजोड करण्याऐवजी त्या सर्वांना पक्षातून काढून टाकून आदर्श निर्माण करणारे दीनदयाळ आजही आदरणीय व अनुकरणीय आहेत. पक्षाच्या धोरणाचे समर्थन करणारे एकमेव आमदार म्हणजे नंतर राजस्थानचे मुख्यमंत्री आणि उपराष्ट्रपती झालेले कै. भैरोसिंह शेखावत हे होते.''

माजी उपमहापौर व नगरसेवक श्री. दिलीप पटेल यांनी यावेळी प्रास्ताविक केले, तर भाजपा मुंबईचे उपाध्यक्ष श्री. जयप्रकाश ठाकुर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. आमदार श्री. गोपाळ शेट्टी, उपमहापौर श्रीमती शैलजा गिरकर, नगरसेविका श्रीमती विद्या ठाकुर, श्रीमती भारती केणी, कु. उज्वला मोडक, नगरसेवक डॉ. राम बारोट, श्री. मोहन मिठबावकर, श्री. प्रविण शहा, विश्व हिंदु परिषदेच्या कोकण प्रांताचे अध्यक्ष श्री. देवकीनंदन जिंदल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्थानिक संघचालक सर्वश्री दाऊ दयाळ शर्मा, अरविंद भावे व डॉ. नवनीत शहा, संस्कार भारतीचे श्री. सुभाष देव तसेच सर्वश्री आर. यु. सिंह, भाई गिरकर, अतुल भातखळकर, हैदर आझम, रमेश मेढेकर, राजेश शर्मा, अरुण देव, आदी भाजपा नेते तसेच संघ परिवारातील अनेक मान्यवर यावेळी आवर्जून उपस्थित होते.

**(सुभाष देव)करीता**